# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

जाहिरात क्र./1059/पी.आर

दिनांक :-17/03/२०२५

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत मनपाचे लोकोपयोगी उपक्रम, विकास कामे, जाहीर सुचनांची प्रसिद्धी ही जनसंपर्काच्या विविध माध्यमातून प्रसारण करणे, त्या प्रसिद्धीचा परिणाम विविध विभागाकडे कळविणे इत्यादी कामासाठी खालीलप्रमाणे अनुभव असलेल्या जनसंपर्क विभागाअंतर्गत **"कंत्राटी प्रसिद्धी सल्लागार"** हे पद निव्वळ कंत्राटी तत्वावर प्रथमत: ६ महिन्याचे कालावधीकरिता एकमुस्त मानधन प्रतिमाह रु.५०,०००/- (पन्नास हजार) वर भरावयाचे आहे. इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.03/04/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता, अति. आयुक्त (सामान्य), म.न.पा मुख्यालय सिव्हील लाईन्स, यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | "कंत्राटी प्रसिद्धी सल्लागार | ०१ | ४५ वर्षापेक्षा जास्त नसावी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारीतेची पदवी/पदव्युत्तर. BA (Mass Communication)/BJ(Mass Communication) /MA(Mass Communication) तसेच शासनाच्या/मनपाच्या/ खाजगी कंपनीच्या जनसंपर्क विभागासोबत कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ब) मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेचे ज्ञान, संगणकीय ज्ञान आवश्यक.<br>क) विविध माध्यमांसाठी बातमी तयार करण्याचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक |

वरील पदाकरिता इच्छूक उमेदवारांनी दि. 03/04/२०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पद्धतीने असेल.
३. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
४. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
५. शासन निर्णय दि. ९ फेब्रुवारी, २०१८ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पद्धती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी-शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमुद असल्याने उक्त पदावरील नियुक्ती ही निवड कंत्राटी स्वरूपाची असून, पुढे नियमित करण्यात येणार नाही.
६. वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 03/04/२०२५ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च सा.प्र.वि. विभागाच्या व्यय पद क्र. A२०१००११०००२ मधून राहील.
८. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.
९. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.
१०. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.
११. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.
१२. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
१३. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता / अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२५

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..............................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..............................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..............................................................................

..............................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..............................................................................

ई-मेल आय डी :- ..............................................................................

४. जन्म दिनांक :- ..............................................................................

५. दि. / /२०२५ ला वय :- ..............................................................................

६. शैक्षणिक पात्रता :- ..............................................................................

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ | श्रेणी | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अनुभव :- ..............................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | कर्तव्य व जबाबदारी | कालावधी | उल्लेखनीय कामगीरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner